MHNB060000902026

संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ५७/२०२६
सरकार
//वि//
रविंद्र भायजी भिल
निशाणी क्रमांकः ०९/ब खाली

## – न्या य नि र्ण य –

## ( दिनांक :– ०५/०८/२०२६)

प्रस्तुत खटला वरील आरोपी विरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) नुसार चालविण्यात आला.

०२. विद्वान सरकारी वकिल व आरोपी तर्फे विद्वान वकिलांचा तोंडी युक्तीवाद ऐकला. साक्षीपुरावे व संचिकेचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद व प्रकरणाचे स्वरूप पाहता खालील मुद्दे विचाराधीन येतात. सदर मुदयांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दिनांक १०/१२/२०२५ रोजी १३.५० वाजेच्या सुमारास प्रकाशा गावात वैजाली रोडावर एका पिंपळाच्या झाडाखाली, सार्वजनिक जागी, एका पांढऱ्या रंगाच्या प्लॅस्टीकचया गोणीमध्ये १ लिटर क्षमतेचे ६० पाऊच असा एकुण ६० लिटर गावठी हात भटटीची दारु असा एकुण ६,०००/– रुपयांचा मुददेमाल विक्री करण्याच्या उद्देशाने कब्जात बाळगत असतांना मिळून आला हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही.... |
| २) | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## –कारणमिमांसा–

०३. आरोपी विरूध्दचा दोष सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०१ पंच– अजय संतोष दाभाडे यांची साक्ष नोंदविली. वारंवार संधी देवूनही अभियोग पक्षाने इतर

साक्षीदारांच्या साक्षी नोंदविल्या नाहीत. त्यामुळे निशाणी १ वर आदेश पारित करून अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

४. अभियोगपक्षाच्या साक्षीदारच्या साक्षीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अभियोगपक्ष आरोपीविरुध्द पुरावा सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे म्हणून आरोपीविरुध्द भा.ना.सु. संहितेचे कलम ३५१ अन्वये जबानी वगळण्यात आली.

<u>मुद्दा क्र.१ व २ करिता</u>–

**०५**. आरोपी वरील आरोप शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले पंच सा.क्र.१ अजय संतोष दाभाडे यांनी त्यांच्या साक्ष सरतपासात कथन केले की, दि.१०/१२/२०२५ रोजी पोलिसांनी दुरक्षेत्र प्रकाशा पोलीस चौकी येथे बोलविले होते. पोलीसांनी त्यांची फक्त सही घेतली. पोलिसांनी त्यांचे समक्ष काही जप्त केले नाही व कोणताही पंचनामा केला नाही. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास पुरक अशी साक्ष दिली नाही. त्यामुळे सरकारी वकिलांनी न्यायालयाच्या परवानगीने त्यांना सूचक प्रश्ने विचारली. परंतू, त्यात देखील सदर साक्षीदाराने आरोपी विरूध्द कुठलेही आक्षेपार्य कथने केली नाहीत.

**०६**. अभियोग पक्षाच्या पुराव्याचे काळजीपूर्वक अवलोकन केले. महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये दारु आरोपीने स्वत:च्या ताब्यात विनापरवाना व बेकायदेशीर गावठी हातभट्टीची दारुची चोरटी विक्री करण्याच्या उददेशाने बाळगली असा पुरावा येणे अभिप्रेत आहे. प्रकरणात तपासण्यात आलेले सा.क्र.१ अजय संतोष दाभाडे हे जप्ती पंच असून त्यांनी अभियोगपक्षाचे समर्थनार्थ साक्ष दिलेली नाही. त्यामुळे जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आला हे सर्व संशयापलीकडे सिद्ध होत नाही. तसेच आरोपीने दारु तयार केली अथवा विकत घेतली किंवा विक्री केली याबाबत देखील कुठलाही ठोस पुरावा समोर आलेला नाही. उपस्थित पुरावा आरोपीस दोषी ठरविण्यास पुरेसा नसल्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त करण्यास पात्र ठरतो. म्हणून मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ चे उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१) भारतीय न्याय सुरक्षा संहितेचे कलम २७८ (१) अन्वये आरोपीची महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) च्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीने भारतीय न्याय सुरक्षा संहितेचे कलम ४८१ प्रमाणे रक्कम रुपये १५,०००/– चे जामीन बंधपत्र द्यावे, जे सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहिल.

३) आरोपीने पुर्वी दिलेले जमानतीचे बंधपत्रे व वैयक्तीक बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

४) जप्त दारु जागीच नाश केल्याने त्याबाबत आदेश नाही.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by KRUNAL JAGDISH PATEL
Date: 2026.08.05 17:15:11 +0530

**( कृणाल ज. पटेल )**

शहादा. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,कोर्ट क्र.०१,
दिनांक– ०५/०८/२०२६ शहादा, जि. नंदुरबार.

**<u>CERTIFICATE</u>**

I certify that the contents of this PDF File are word to word as per Original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | K. V. Pingale |
| Name of the Court | :- | Jt. Civil Judge J.D. & J. M. F. C.,<br>Court, Shahada, Dist. Nandurar. |
| Date of Judgment | :- | 05/08/2026 |
| Sign on Judgment | :- | 05/08/2026 |
| PDF Uploading Date | :- | 05/08/2026 |